झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे- ५६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोपुआ/ २२९ /२०२४
दिनांक : १९/०९/२०२४

झोपडपट्टी निर्मुलन आदेश
(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(ड) सह कलम १२ अंतर्गत अंतिम आदेश)

प्रस्तावना -

स.नं.८८पै, अजंठानगर, आकुर्डी येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम १२ अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(२) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(ड) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(३) ज्याअर्थी, अनुसुचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी दि. जुन २२-२८, २०२३, पान नं.१२ ते १३ राजपत्रामध्येही प्रसिध्द झालेली आहे. आणि दि.१०/०६/२०२३ रोजीच्या दैनिक संध्या व विश्वेश्वर या स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेत आली असून सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.१२/०६/२०२३ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

(४) विकसक मे. आर.के.डेव्हलपर्स यांचेमार्फत उपरोक्त मिळकतीवर राहणा-या सर्व झोपडीधारकांची झोपडीधारकांची तात्पुरत्या स्वरुपात राहण्याची व्यवस्था त्यांच्या जबाबदारीवर स.नं.६५ हि.नं.१ व २, आकुर्डी, निगडी या भूखंडावर उभारणेत आलेल्या संक्रमण शिबीरामध्ये (Transit Camp) करणार असलेबाबत रु.१००/- च्या मुंद्रकावरील हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे.

(५) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या कार्यान्वयना संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अधिनियमातील कलम ३(ड) सह कलम १२ च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करण्यासंदर्भातील अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

१) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र घोषीत करण्यासंदर्भातील दि.०७/०६/२०२३ रोजीच्या पूर्वसूचना आदेशामधील सर्व शर्ती-अटी लागू राहतील या निर्देशासह सदर आदेश कायम करण्यात येत आहे.

२) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिका-यांना राहतील.

३) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास अशा प्रकरणी पात्रता धारण केलेली असली तरीही असा झोपडीधारक, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

४) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्रात कोणासही कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करता येणार नाही व अशी बाब निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता असे बांधकाम पाडणेत येईल.

५) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती अपराधसिध्दीनंतर उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

६) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचे कार्यालयात अपिल दाखल करणे शक्य आहे.

**झोपडपट्टीचे नाव** - **स.नं.८८ पैकी, अजंठानगर, आकुर्डी**
**महानगरपालिका क्षेत्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

**अनुसूची**

| गाव- आकुर्डी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.८८ पैकी | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | १०९२२.९७ चौ.मी. | अंतर्गत रस्ता | लागू टेल्को रस्ता | लागू स.नं.८८ पै,सि.स.नं. ५३८६ पै | लागू स.नं.८८ पै व अंजठानगर पुनर्वसन योजना |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- १९/०९ /२०२४

(नीलेश र. गटणे), (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :-

१. मा. जिल्हाधिकारी - जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-०१, यांना माहितीस्तव सादर.
२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -१९- यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.

(२) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये सदरचा आदेश कायम करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

(३) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

(४) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी.

(५) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

(६) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

(७) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

**झोपडपट्टीचे नाव - स.नं.८८ पैकी, अजंठानगर, आकुर्डी**
**महानगरपालिका क्षेत्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

अनुसूची

| गाव- आकुर्डी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.८८ पैकी | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | १०९२२.९७ चौ.मी. | अंतर्गत रस्ता | लागू टेल्को रस्ता | लागू स.नं.८८ पै, सि.स.नं. ५३८६ पै | लागू स.नं.८८पै व अंजठानगर पुनर्वसन योजना |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- ०७/०६/२०२३

(नीलेश र. गटणे), (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :-

१. मा. जिल्हाधिकारी - जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-०१, यांना माहितीस्तव सादर.
२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -१९- यांना माहितीस्तव व पुढील कार्यवा[illegible]